**( प्रवेश प्रक्रिया : 2020-2021)** **दि.01.08.2020.**

**॥ प्रथम वर्ष (FY) Merit list व प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची नोटीस ॥**

**खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

# के.एम.सी.महाविद्यालय खोपोली, जि.रायगड.

**प्रथम वर्ष कला,विज्ञान,वाणिज्य व संगणकशास्त्र (FYBA, FYBCOM, FYBSC, FYBCS)** या वर्गासाठी **Online Pre Registration** केलेल्या विद्यार्थ्यांनी खालील **सर्व सूचना काळजीपूर्वक** वाचाव्यात आणि त्याप्रमाणे **प्रवेश शुल्क व प्रमाणपत्रे जमा करून आपला प्रवेश निश्चित करावा.**

# महाविद्यालयाच्या **www.kmccollege.in** या वेबसाइटवर **2020-21** चे **Prospectus (माहितीपुस्तिका)** व **प्रवेश शुल्काचे तक्ते (Admission Fee chart)** व **वर्गनिहाय प्रवेश क्षमता Intake Capacity** दिलेली आहेत. त्यात नमूद केल्याप्रमाणे आपल्याला **लागू असणारे प्रवेश शुल्क** विद्यार्थ्यांनी भरायचे आहे. विद्यार्थ्यांनी Prospectus Download करून ते लक्षपूर्वक बारकाईने वाचावे.

१) मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे **मंगळवार दि.04.08. 2020 रोजी सायं. 7.00 वा.पहिली गुणवत्ता यादी (First Merit list)** महाविद्यालयाच्या या **www.kmccollege.in** वेबसाइटवर जाहीर केली जाईल.विद्यार्थ्यांना मिळालेले **गुण, विषयानुसार उपलब्ध जागा व सामाजिक प्रवर्गानुसार (Reservation) ही गुणवत्ता यादी** तयार केलेली आहे.

२) गुणवत्ता यादीत ज्या विद्यार्थ्यांचे नाव आहे, त्यांनी **बुधवार दि.05.08.2020 ते 10.08.2020** याच कालावधीत दिलेल्या **वेळापत्रकानुसारच प्रवेश फी भरण्यासाठी व मूळ कागदपत्रे जमा** करून आपला **प्रवेश निश्चित करण्यासाठी महाविद्यालयात यायचे आहे.**

**# • अत्यंत महत्वाचे:-** एकाच दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश शुल्क भरण्यासाठी महाविद्यालयात यायचे नाही. **Merit list बरोबर कोणत्या विद्यार्थ्यांनी, कोणत्या तारखेला, किती वाजता यायचे आहे, याचे सविस्तर वेळापत्रक दिलेले जाईल, ते लक्षपूर्वक पहावे.**

३) प्रवेश शुल्क व प्रमाणपत्रे जमा करण्यासाठी महाविद्यालयात येताना **विद्यार्थ्यांनी मास्क घालणे बंधनकारक आहे.** गर्दी होणार नाही यासाठी **मर्यादित विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार आहे.** त्यामुळे **सोशल डिस्टंसिंगचे पालन** काटेकोरपरपणे करावे लागेल.

४) ज्या दिवशी विद्यार्थ्यांना फी भरायची आहे, **ती तारीख व वेळ नीट पहावी.** त्याच दिवशी **फी भरून व प्रमाणपत्रे जमा करणे बंधनकारक** आहे. अन्यथा आपण प्रवेश घेण्यास इच्छुक नाही, असे समजून गुणवत्ता यादीतील (Merit list) पुढील विद्यार्थ्यास प्रवेश दिला जाईल, याची नोंद घ्यावी. **नंतर तक्रार करता येणार नाही.**

५) विद्यार्थ्यांनी भरलेला Online Form बरोबर आणावा. प्रवेश घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा प्रवेश अर्ज भरून द्यावा लागेल. तो विद्यार्थ्यांना त्याच दिवशी दिला जाईल. त्यासोबतच जोडावयाच्या **कागदपत्रे /प्रमाणपत्रे यादी सोबत दिलेली आहे.** सर्व प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स- **एक प्रत** ऑनलाइन अर्जाला जोडावी आणि **दुसरी प्रत** महाविद्यालयात दिलेल्या प्रवेश अर्जाला जोडावी. **तिसरी प्रत** शिष्यवृत्ती फॉर्मसाठी जमा करावी. म्हणजेच सोबत दिलेल्या प्रमाणपत्र /कागदपत्रांच्या **झेरॉक्स प्रती एकूण 03 स्वतंत्र बंच (सेट) विद्यार्थ्यांनी सोबत आणावेत.** पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, काळा बॉलपेन, फोटो चिकटवण्यासाठी गम बॉटल हे विद्यार्थ्यांनी स्वतः आणायचे आहे.

६) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी विषय निवडलेले आहेत, पण प्रत्येक **विषयाच्या उपलब्ध जागा, तुकड्यांची संख्या** हे सर्व विचारात घेऊन गरजेनुसार काही विषय विद्यार्थ्यांना बदलून दिले जातील. विद्यार्थ्यांचे **विषय अंतिम करण्याचा अधिकार प्रवेश समिती व महाविद्यालयास राहतील,** याची नोंद घ्यावी. **१२ वी गुणपत्रिका व शाळा सोडल्याचा दाखला याची मूळ प्रत** द्यावी लागेल.

७) प्रवेश घेण्यासाठी सोबत आणावयाची **कागदपत्रे सोबत** जोडली आहेत. (जोडपत्र पहावे.)

- **अन्य सर्व आवश्यक** कागदपत्रांच्या **पुरेशा झेरॉक्स प्रती (कमीत कमी प्रत्येकी तीन प्रती)** विद्यार्थ्यांनी बरोबर आणणे गरजेचे आहे आणि **भरावयाची प्रवेश फी** या तयारीनिशी विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे **प्रवेश निश्चित करण्यासाठी उपस्थित रहावे.** म्हणजे विद्यार्थ्यांना पुन्हा-पुन्हा प्रवेशासाठी महाविद्यालयात येण्याची आवश्यकता भासणार नाही. अपूर्ण कागदपत्रे व वेळेवर उपस्थित न राहिल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकला नाही, तर ती **सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील,** याची सक्त नोंद घ्यावी.

८) प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणत्याही शंका असतील/ अडचणी असतील तर त्यांनी प्रवेश समितीतील प्राध्यापकांशी फोनवरून/मेसेज करून चौकशी करावी. शंकांचे निरसन करून घ्यावे.

**# टिप:** ज्याचा प्रवेश घ्यायचा आहे तो विद्यार्थी-विद्यार्थिनी व **गरज असेल तरच पालक** यांना बरोबर आणावे. अनावश्यक मित्रांना/मैत्रिणींना बरोबर घेऊन येऊ नये. **खबरदारी व स्वतःची काळजी :-** कोरोना संसर्गाचा धोका लक्षात घेऊन **विद्यार्थ्यांनी स्वतःची काळजी स्वतः घ्यायची आहे.** आवश्यक ती सर्व खबरदारी व काळजी घेऊन आपली प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. **मास्क लावणे, सॅनिटायझर वापरणे, सुरक्षित अंतर ठेवणे याबाबत निष्काळजीपणा करू नये.** शासनाने वेळोवेळी दिलेल्या **सूचना व आवश्यक ती सर्व खबरदारी घेणे** ही विद्यार्थ्यांचीच जबाबदारी आहे, हे लक्षात घ्यावी.

@ सदर सूचना दि .०१.०८.२०२० रोजी
कॉलेज वेबसाईट वर उपलोड केली.

**- प्र.प्राचार्य,**
**के.एम.सी. महाविद्यालय,खोपोली,जि.रायगड.**

==================================================================